मराठी नाट्यसमीक्षा

(पुस्तक परीक्षण)

अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - समाज प्रबोधन पत्रिका, संपा. भालचंद्र भणगे, प्रकाशक - ग प्र प्रधान, पुणे, सप्टेंबर-ऑक्टोबर १९६९)
(पुस्तक परीक्षण - 'मराठी नाट्यसमीक्षा', रा. शं. वाळिंबे, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६८ रु. १६.००)

महाराष्ट्राला नाटक आणि राजकारण यांचे वेड आहे असे नेहमी म्हटले जाते आणि हे काही फारसे चूकही नाही. या दोन गोष्टींविषयी महाराष्ट्रात खरोखरच जरा अधिक क्रियाशील जिव्हाळा आहे. नाटकात व राजकारणात प्रत्यक्ष भाग घेणे असो किंवा त्याविषयी यथाशक्ती, यथामती बोलणे-लिहिणे असो, दोन्ही घटना मनःपूर्वक झालेल्या दिसतात.

अर्वाचीन महाराष्ट्रातला कलाविचार पाहिला तर हीच गोष्ट प्रत्ययास येते. इतर कशाच्याही विचारापेक्षा नाट्यविचार अधिक प्रमाणात झाला आहे; इतकेच नव्हे तर गुणदृष्ट्याही तो बराच सकस आहे. अर्वाचीन मराठी ललित साहित्यात जे नवीन वाङ्मयप्रकार फोफावले त्यात कालानुक्रमे नाटक प्रथम यावे आणि नाट्यविचारही अधिक बाळसेदार असावा या घटनांचे मूळ केवळ योगायोगात शोधू नये असे वाटण्याइतपत मराठी नाट्यसमीक्षा विविधांगी, विस्तृत आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मूळ धरू लागलेली ही नाट्यसमीक्षा अनेक ठिकाणी विखुरलेली दिसते. वर्तमानपत्रे, मासिक पत्रिका, पत्रव्यवहार, प्रस्तावना, टीकानिबंध अशी अनेक स्वरूपे आणि तीही अनेक ठिकाणी अवतरली असल्याने या समीक्षेचे विनासायास सम्यक् दर्शन होणे अवघड आहे आणि असे सम्यक् दर्शन घडल्याशिवाय तिने काही परंपरा निर्माण केली का, आजच्या समीक्षेस तिचे महत्त्व वाटावे का, वाङ्मयीन समीक्षा आणि इतर कलांचा विचार यांच्याशी तिचे नाते कोणत्या प्रकारचे होते इ. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ पाहणे अशक्यच. या संदर्भात पाहता डॉ. वाळिंबे यांनी पुणे विद्यापीठातर्फे कै. न. चिं. केळकर व्याख्यानमालेत या विषयावर दिलेली व्याख्याने ही एक महत्त्वाची घटनाच मानावी लागेल. डॉ. वाळिंब्यांनी अस्सल वा इतर दर्जाचा पुरावा धुंडाळण्यात आणि त्याची सूची इ. स्वरूपात नोंद करण्यात मोठी बारकाई दाखविली आहे. पण या साऱ्या घटनांना सूत्रात गुंफणे किंवा त्यांचा अर्थ लावणे मात्र त्यांना नीटसे जमलेले नाही. मराठी नाट्यसमीक्षेचा इतिहास सांगता सांगता तिच्या स्वरूपाचा ते मागोवा घेतील, वा अंतर्वेधी टीकादृष्टीच्या साहाय्याने हा इतिहास केवळ ऐतिहासिक महत्त्वाचा न राहता वाङ्मयीन महत्त्वाचा ठरेल इ. अपेक्षा त्यांनी पुऱ्या केल्या नाहीत.

या पुस्तकाचा उद्देश, डॉ. वाळिंब्यांच्याच शब्दात सांगावयाचा तर, "मराठीतील नाट्यसमीक्षेचा शक्य तितका कालानुक्रम सांभाळून इतिहास सांगणे" असा आहे. पण याही दृष्टीने डॉ. वाळिंब्यांचा प्रयत्न तुटपुंजा आहे. कारण, जरी कालदृष्ट्या १९३५ पर्यंतची नाट्यसमीक्षा त्यांनी विचारात घेतली असली तरी, १९२० ते ३५ या कालखंडातील समीक्षेचा विचार सूक्ष्मपणे व तपशीलवार करणे अशक्य झाल्याचीही नोंद त्यांनी प्रस्तावनेतच केली आहे. म्हणजे मराठी नाट्यसमीक्षेचा या पुस्तकात आलेला इतिहास प्रथमतः "१९२०पर्यंतचा" आणि मग "स्थूलमानाने १९३५ पर्यंतचा" असा अधिकाधिक मर्यादित झाला आहे. डॉक्टर साहेबांनी केलेल्या खटाटोपाचे महत्त्व यामुळे निश्चितपणे कमी होते. ग्रंथनामाने निर्देश होत असणारा विषय व त्याची व्याप्ती आणि ग्रंथांतर्गत प्रयत्नाचे स्वरूप व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचा डॉ. वाळिंब्यांच्या पुस्तकात जबरदस्त विरोधसंबंध दिसतो. 'अर्वाचीन मराठी नाट्यसमीक्षा' असे ग्रंथनाम डॉक्टर साहेबांनी या व्याख्यानांना दिले असते तर अभ्यासकांची दिशाभूल टळली असती.

पण प्रयत्नाच्या या कालसंबद्ध अपुरेपणापेक्षाही महत्त्वाचा असा दोष पुस्तकास छेदून जाताना आढळतो. 'नाट्यसमीक्षा म्हणजे काय?' या मूलभूत प्रश्नाचे कोणते उत्तर डॉ. वाळिंब्यांना अभिप्रेत आहे याचा उलगडा होत नाही, हा तो दोष होय. नाट्यसमीक्षेसारख्या वैचारिक चळवळीविषयी लिहित असता असा उलगडा होणे आवश्यक असते. नाहीतर लेखक हा वैचारिक पातळीवर निवाडे करीत नसून केवळ त्या निमित्ताने माहिती देत आहे असे वाटू लागते. डॉ. वाळिंबे यांच्या पुस्तकाच्या वाचनात हाच प्रत्यय सारखा येतो.

उदाहरणार्थ, नाट्यसमीक्षा या संकल्पनेचीच गोष्ट घ्या. नाटकासारख्या संमिश्र आणि व्यामिश्र कलाप्रकारात ज्या ज्या गोष्टींचा समावेश होतो त्या त्या सर्वांचा (वा बहुतेकांचा) एकत्र विचार म्हणजे काही नाट्यसमीक्षा नव्हे. निदानपक्षी, प्रयोगविचार आणि 'पाठ्यकाव्य' (के. नारायण काळे यांचा शब्द वापरावयाचा तर) म्हणून एखाद्या नाटकाकडे पाहिल्यामुळे उद्भवणारा विचार ही नाट्यसमीक्षेची किमान दोन वेगवेगळी रूपे आहेत अशी जाणीव नाट्यसमीक्षेच्या विचारात असायला हवी. अभिनयगर्भ शब्दात आपले अंतिम रूप शोधणारा आविष्कार आणि रूपसिद्धीसाठी अभिनयाविष्कारात परिणत होणारा कलानुभव यांची समीक्षाही वेगवेगळी रूपे धारण करते, आणि नाट्यसमीक्षा या संज्ञेखाली जरी या दोन्हींचा विचार होत असला तरी, दोहोंतली भेदरेषा मान्य न करता झालेली समीक्षा ही अतिव्याप्त, सरसकट समीक्षा होते. कारण, नाटक प्रयोगशरण असते याचा अर्थ असा नव्हे की त्याचे प्रयोगनिकषांच्या आधारे झालेले मूल्यमापन हेच अंतिम असते. प्रयोगशरणतेच्या संकल्पनेचा दावा इतकाच की साहित्यसमीक्षेच्या निकषांनी नाटक पारखीत असता त्याच्या प्रयोगशक्यतांचेही भान ठेवणे शक्य आहे. मुद्दा असा की, या दोन निकष-जाति (कोटि) वेगवेगळ्या उद्देशांनी प्रेरित झाल्या आहेत हे लक्षात न घेता डॉ. वाळिंबे त्यावर आधारलेल्या नाट्यसमीक्षांचा एकत्र विचार करतात आणि परिणामी नाट्यसमीक्षा ह्या संकल्पनेच्या बाह्यरेषा पुसट करून टाकतात. वाङ्मयांगी विचार आणि प्रयोगसंबद्ध विचार या मराठी नाट्यसमीक्षेच्या दोन अवस्थांचे पौर्वापर्य, विशिष्ट काली यांपैकी एखादी अवस्था का प्रभावी होती या आधारे एकंदर कलाविचाराच्या स्वरूपावर पडणारा प्रकाश, इ. सर्व प्रश्न डॉ. वाळिंबे उभेही करीत नाहीत. यामुळे विवेचन सोपे होते, पण सूक्ष्मपणाची किंमत देऊनच.

उदाहरणार्थ, 'चिपळूणकर युग' या पहिल्याच प्रकरणात सांगलीकर हिंदू नाटककारांनी पुण्यास प्रयोग केला असता ज्ञानप्रकाशकारांनी त्याचे जे 'परीक्षण' केले ते डॉ. वाळिंबे आपल्यासमोर ठेवतात, आणि नंतर, कोणत्याही विवेचनाशिवाय, कीर्तन्यांच्या 'जयपाल' नाटकाचे थोरल्या शास्त्रीबोवांनी शालापत्रकात केलेले परीक्षणही 'विस्ताराने व अनेक दृष्टींनी लिहिलेले' (आणि म्हणून महत्त्वाचे) असे गौरवून नोंदवितात. ही दोन्ही परीक्षणे एकाच श्वासात उच्चारण्यासारखी नव्हेत ही गोष्ट उघड आहे. 'जयपाल'च्या परीक्षणात शास्त्रीबुवांनी चर्चेला घेतलेल्या प्रश्नांचा रोख अगदी स्पष्टपणे नाटकाकडे वाङ्मयप्रकार म्हणून पाहणाऱ्याचा आहे. विषयाची निवड, त्या विषयाचे परकीयपण, भाषाशैली, वर्णनशैली, इ. मुद्द्यांची चर्चा करणाऱ्या शास्त्रीबुवांचा नाट्यविचार आणि "तमाशापेक्षा नाटक बरे", "रोषणाई आणि सजावट चांगली होती" इ. विधाने करणाऱ्या ज्ञानप्रकाशकर्त्यांचा नाट्यविचार यातील भेद अंशाचा नसून जातीचा आहे. हा भेद लक्षात न घेता केलेल्या विवेचनात दोन वेगवेगळ्या प्रेरणांनी प्रभावित झालेल्या नाट्यसमीक्षेच्या स्वरूपावस्थांची अधिक नेमकी चिकित्सा करणे डॉ. वाळिंब्यांना अर्थातच जमलेले नाही.

प्रयोगसमीक्षा आणि पाठ्यकाव्यसमीक्षा (म्हणजे नाटकाचे वाङ्मयकृती म्हणून केलेले मूल्यमापन) यातील भेद लक्षात न घेता केलेल्या विवेचनात अर्वाचीन मराठी नाट्यसमीक्षेच्या आणखी एका स्वरूपगत विशेषाकडे डॉ. वाळिंब्यांचे दुर्लक्ष झाले आहे. ग्रांथिक नाटकांचा अवतार मराठीत जसा इंग्रजी विद्याविभूषितांच्या हस्ते झाला होता तसेच या नाटकांचे मूल्यमापनही १८व्या शतकातील इंग्रजी समीक्षेचा मार्ग अनुसरणाऱ्या टीकाकारांकडून होत होते. घटना, चरित्ररेखा, संवाद, भाषाशैली अशा निश्चित कोटी मानून त्या वर्गीकरणानुसार नाट्यकृती पाहिली जात होती, ती या इंग्रजी समीक्षेच्या निकषांच्या आधारे. वाङ्मयीन समीक्षेच्या या

कोटीतून नाट्यसमीक्षा जात होती. नैतिक भूमिकेच्या संदर्भात नाट्यकृती तपासणे वा कलाविष्कार जोखणे हा आशय प्रभावित दृष्टिकोण हा कलाविचार वाङ्मयविचाराच्या मळवाटेने चालला असल्याचाच परिणाम होय. कलाविचार वाङ्मयावलंबी होता आणि जसजसा नाट्याविष्कार समृद्ध होत गेला तसतशी प्रयोगसमीक्षा मूळ धरू लागली. तोपर्यंत, म्हणजे जवळजवळ साऱ्या चिपळूणकरयुगातली नाट्यसमीक्षा ही वाङ्मयावलंबी होती. कोल्हटकरी समीक्षाही वाङ्मयांगीच होती आणि इंग्रजी समीक्षेचा आधारही तिने सोडला नव्हता. पण नाटककाराने आणि मर्मज्ञ साहित्यिकाने केलेली ही समीक्षा असल्याने तिला अधिक खोली होती. शिवाय ती अधिकाधिक प्रयोगसंमुखही होत होती. इंग्रजी समीक्षेचा मराठी नाट्यसमीक्षेवर असलेला जन्मजात पगडा आणि त्यामुळे तिने घेतलेली विशिष्ट वळणे यांचे अभ्यासपूर्ण विवेचन डॉ. वाळिंब्यांनी कसे केले नाही याचे आश्चर्यच वाटते.

प्रयोगसमीक्षा आणि वाङ्मयांगी समीक्षा यातील भेद जसा डॉ. वाळिंब्यांनी जुजबीपणे जाणला तसाच प्रकार नाट्यविचार आणि नाट्यसमीक्षा यांतील भेदाबाबतही झाला आहे. उदा. "नाट्यकला आणि नाट्यव्यवसाय याविषयी समाजाची विचारसरणी" यांसारख्या प्रकरणाचा नाट्यसमीक्षेशी संबंध काय? अशा विचारसरणीतून जर नीतिवादी नाट्यसमीक्षा जन्माला आली असती तर या प्रकरणास काही अस्तित्वकारण मिळाले असते. परंतु नीतिवादाच्या आधारे नाट्यकला आणि नाटक यांचे स्थान आणि महत्त्व ठरविणारी नाट्यसमीक्षा शक्य झाली नाही. कारण यासाठी नीतिसंकल्पनांवर आधारित अशा एका विस्तृत वैचारिक बैठकीचे अस्तित्व आणि त्यास पायाभूत मानून नाटक इ. कलाविष्कारांकडे पाहण्याचा सुसंगत आणि प्रदीर्घ असा प्रयत्न होणे आवश्यक होते. या तऱ्हेच्या प्रयत्नास वाव मिळणे हे दोन पूर्वशर्तींवर अवलंबून आहे. एक तर वाङ्मयाकडे जीवनाचा स्वयंपूर्ण आविष्कार म्हणून पाहिले पाहिजे आणि दुसरे म्हणजे कलाव्यवहारातून हाती लागणाऱ्या निकषांद्वारे सिद्ध होणारी विधानांची संगतवार रचना हीच समीक्षा, अशी धारणा हवी. या दोन्हींचा अर्वाचीन महाराष्ट्रात अभाव असल्याने नीतिवादी समीक्षा मूळ धरू शकली नाही. डॉ. वाळिंबे विचारात घेतात ती नीतिवादी नाट्यसमीक्षा नसून नाटकाच्या सामाजिक दुष्परिणामांकडे लक्ष वेधणारा तो नाट्यविचार होय. हा विचार नाटकाच्या अंतरंगाकडून समाजाकडे जात नसून समाज ते नाटक अशी त्याची वाटचाल असते. हा भेद स्पष्ट न करता डॉ. वाळिंबे जेव्हा समाजाची नाट्यविषयक धारणा काय होती यासंबंधी तपशीलवार माहिती नोंदवू लागतात तेव्हा पुन्हा एकदा त्यांच्या लिखाणातील केंद्रहीनतेची जाणीव होऊ लागते. वास्तविक पाहता वर उल्लेखिलेले दुसरे प्रकरण आणि "हीन अभिरुची, अश्लीलता, आणि ग्राम्यता" या शीर्षकाचे पाचवे प्रकरण यातील माहिती नीतिवादी समीक्षेच्या संकल्पनेचा आधार घेऊन अधिक अर्थपूर्णतेने विचारात घेता आली असती. पण माहिती देण्याचा मोह आवरत नाही आणि नेमकेपणे विवेचन करणे जमत नाही अशी डॉ. वाळिंब्यांची पंचाईत आहे. गैरलागू विस्ताराच्या धक्क्यातून त्यांच्या विवेचनाचे दर्शन घ्यावे लागते.

या गैरलागू विस्ताराचे उदाहरण म्हणून पुस्तकातले सातवे प्रकरण पाहण्यासारखे आहे. डॉक्टरसाहेब यात श्री. पावगी यांच्या "भारतीय नाटकशास्त्र आणि नाट्यकला" या पुस्तकाविषयी लिहीत आहेत. या प्रकरणास दिलेल्या "संस्कृत नाट्यशास्त्राशी पहिला परिचय" या शीर्षकावरूनच पावगी यांच्या प्रयत्नांचे ऐतिहासिक महत्त्व डॉ. वाळिंबे आपल्या नजरेस आणतात. परंतु इथेसुद्धा अशा महत्त्वाच्या पुस्तकामुळे सुचणारे प्रश्न उभे न करता, एकंदर समीक्षाप्रवाहात या पुस्तकाचे नेमके स्थान कोणते याविषयी डॉ. वाळिंबे फार ढोबळ विवेचन करतात. मुळातच संस्कृत साहित्यशास्त्राची परंपरा मराठी समीक्षेला चैतन्यदायी ठरली की नाही? मराठी समीक्षेच्या प्रांगणात संस्कृत आणि इंग्रजी साहित्यपरंपरांचा संघर्ष झाला की नाही? (असा संघर्ष असता तर श्री. पावगींचे पुस्तक हे असे एकमेव म्हणून नजरेत भरले नसते.) का. बा. मराठ्यांनी 'नावल व नाटक' या निबंधात दशरूपककर्ता धनंजय व भरत यांचा उल्लेख केला आहे, विविधज्ञानविस्तारातही रसचर्चा इ.चे प्राथमिक स्वरूपाचे उल्लेख आहेत, असे असताही पावगींचे पुस्तक आद्य का म्हणावे लागते? हे सारे प्रश्न उल्लेखिले जात नाहीत. त्यांच्या निर्देशामुळे हे पावगीप्रकरण असे बाजूला पडले नसते. आहे या स्वरूपात

एक प्रामाणिक पुस्तकपरिचय इतकेच त्याचे स्वरूप भासते आणि शिवाय एकंदर विवेचनाचा रोख सतत वाचकांना समजण्यासही याचा अडथळा होतो.

अर्धवट चिकित्सेमुळे बाजूला पडणारे आणखी एक प्रकरण म्हणजे "मराठी रंगभूमीची मार्मिक चिकित्सा" हे होय. अप्पाजी विष्णू कुळकर्ण्यांचे पुस्तक अंगभूत महत्त्वाचे खरेच, पण नाट्यसमीक्षेचा इतिहास सांगताना अशा तऱ्हेचे पुस्तक केव्हा कसे अवतरते याचा समीक्षेच्या एकंदर वाटचालीशी अन्वयार्थ कसा लागतो (किंवा लागत नाही) हे स्पष्ट करावयास नको काय? हे पुस्तक म्हणजे एक दैवी चमत्कार नसून नाट्यसमीक्षेच्या विकासक्रमातील एक टप्पा होता. वाङ्मयालंबी, प्रयोगशरण आणि तात्त्विक नाट्यसमीक्षा असे मराठी नाट्यसमीक्षेचे तीन टप्पे स्थूल मानाने याच क्रमाने पडतात. हे तीन टप्पे म्हणजे विशिष्ट कलेचे स्वयंभू महत्त्व, स्थान अधिकाधिक मान्य होत गेल्याचे गमक होय. या संदर्भात पाहता अप्पाजी कुळकर्ण्यांची समीक्षा पहिले दोन टप्पे गाठते, पण तिसऱ्यावर मात्र कधीकधी पदक्षेप करते. नाट्यसमीक्षेच्या विकासक्रमात हे असे होणे हे एका अर्थी अनिवार्य होते. या तत्त्वसंगतीऐवजी, वा वैचारिक संकल्पनासंबद्ध विवेचनाच्या जागी डॉ. वाळिंबे एक दीर्घ पुस्तकपरिचय आणि पान १२३ वरील एक मामुली मूल्यमापन समोर ठेवतात तेव्हा आपल्या प्रयत्नांचे पहिले आणि निश्चित उद्दिष्ट काय याविषयीच मुळी त्यांच्या मनात गोंधळ आहे याचा पुन्हा एकदा प्रत्यय येतो.

डॉ. वाळिंब्यांच्या या अलक्ष्यवेधी चौफेर आणि विफल शरसंधानाचे कारण शोधू लागले की त्यांच्या लिखाणातील एक चमत्कारिक सूर लक्षात येतो. चमत्कारिक अशासाठी म्हणावयाचे की दीर्घकाल आणि तेही विविध क्षेत्रांचे अध्ययन करणाऱ्या व्यासंगी माणसाची मनोभूमी असा सूर लागण्यास सर्वसाधारणतः अनुकूल नसते. हा सूर म्हणजे 'काल'चे चांगले वा महत्त्वाचे हे सांगताना 'आज'च्याकडे हेटाळणीने पाहणे. व्यासंग वाढावा तसतसे हे असले कालविशिष्ट अभिनिवेश कमी होत जातात. पण डॉ. वाळिंब्यांच्या पुस्तकात हा स्वर संपूर्णतः भरलेला आहे. आणि त्यामुळे त्यांना वर्तमानाचे भूतकालाच्या परिप्रेक्ष्येमध्ये आणि दोन्हींचे तत्त्वचिकित्सेच्या अलिप्त पातळीवर दर्शन घेणे जमलेले नाही. परिणामतः "आजच्या वाचकांनी अमका अमका विचार पन्नास वर्षांपूर्वी झाला आहे हे लक्षात यावे." इ. विधाने त्यांच्या विवेचनात वारंवार येत राहतात. वर्तमानाचा अप्रस्तुत अधिक्षेप आणि भूतकालाविषयी काहीसा भडक जिव्हाळा असा डॉ. वाळिंब्यांचा भाव असतो आणि विवेचनात अनावश्यक खंड पाडून तो व्यक्त होत असतो. कुणालातरी काहीतरी 'शिकविण्याचा' हा प्रकार निश्चितपणे बोचरा आहे. उदा. "शेक्सपीअरच्या नाटकांचे भाषांतर करण्याची लालसा बाळगणाऱ्या आजच्या मराठी लेखकांच्या दृष्टीनेही प्रस्तुत विवेचन फार उपयुक्त असल्यामुळे विस्ताराचा दोष पत्करूनही ते येथे समग्र उतरून घेणे आवश्यक झाले आहे." (पृ. ५३), "कुळकर्ण्यांची टीका इतकी मार्मिक उतरली आहे की अगदी आजच्या निर्मात्यांनी आणि दिग्दर्शकांनीदेखील तिचे सतत मनन केले पाहिजे." (पृ. ११२)

डॉ. वाळिंब्यांच्या या टीपांसारखाच 'रा.शं.वा.' या आद्याक्षरांनी त्यांनी कंसात लिहिलेला मजकूरही बहुधा अनावश्यक आहे. वर निर्देश केलेल्या टीपा वर्तमानकाळातील अनेकांना काहीतरी शिकविण्याच्या हेतूने अवतरतात, तसा हा कंसातला मजकूरही वाचकाला काही कळत नाही आणि त्याला सुजाण केले पाहिजे अशा 'पोज'मुळे अवतरतो. उदा. कारखानीसांच्या अध्यक्षीय भाषणातील 'खरी टीका' या शब्दांचे "म्हणजे सयुक्तिक कारणे देऊन केलेली प्रामाणिक टीका" असे स्पष्टीकरण देण्याची काय गरज होती? (पृ. २१७ पाहा.) त्याचप्रमाणे पृ. २३६ वरील टीप पाहा : "कलावंतीण हे प्रतिष्ठित नाव आहे. वेश्या हे व्यवहारातील रूढ नाव आहे." पुन्हा पृ. २४९ वर डॉ. वाळिंबे टीप देतात : "नर्तकीची म्हणजे वेश्येची"! वाचकांना संदर्भावरून एवढेही कळणार नाही काय? एकंदरीने प्रश्न मामुली वाटतो. पण त्यात दिसणारी प्रवृत्ती हास्यास्पद आहे. एकंदरीने, समजावून सांगणे, स्पष्ट करणे, विवेचन करणे, विस्तृत चर्चा करणे, इ. विद्वत्तेशी साहचर्य असणाऱ्या क्रियांचे डॉ. वाळिंब्यांना भयंकर आकर्षण आहे आणि त्याचे परिणाम मजकुराचे

पोकळ डोलारे उभारण्यात होतात. मर्ढेकरांनी पदटीपांचे पैंजण घालून कविता सजविण्याच्या वृत्तीचा निषेध केला होता. रा.शं.वां.च्या 'कंसभरती'स हा निषेध बरोबर लागू होतो.

सारे पुस्तक वाचल्यावर एक गोष्ट मात्र पक्की नजरेत भरते. ती म्हणजे डॉ. वाळिंब्यांची चिकाटी आणि अफाट वाचन (आणि अनावश्यक झपाट्याचे लेखन!) यामुळेच असे सुचवावेसे वाटते की, मराठी नाट्यसमीक्षेच्या विकासाचा वा वाटचालीचा आलेख दाखविणारे उतारे संपादित केले असते, त्यांचे जर वेचे तयार केले असते तर किती महत्त्वाचे काम झाले असते! यामुळे अभ्यासकांना दुर्लभ पण महत्त्वाची साधने सहज उपलब्ध झाली असती. यांसारखे साधनग्रंथ आपल्याकडे नाहीत ही उणीव डॉ. वाळिंब्यांसारख्या विद्वानांनीच दूर करावयाची आहे.